# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये आदेश

३५५
९।८।९६

जा.क्रं.सनिव/नियमन/कलम ८३ आदेश/श्रमिक
ना.सह.पत संस्था/६४० /२०१७
कार्यालय,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.वर्धा
दिनांक:-२९/ ७ /२०१७

**वाचा :-** १) सौ.के.एस.खुरपडे उपलेखापरीक्षक,सहकारी संस्था,वर्धा यांचा विशेष अहवाल क्रं.जा.क्रं./उपलेप/विशेष अह./श्रमिक नागरी पत संस्था/१०/२०१७ कार्यालय,उपलेखापरीक्षक,सहकारी संस्था,वर्धा अं./जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था,वर्धा दिनांक,२०/३/२०१७

२)संस्थेचा लेखापरीक्षण अहवाल सन २०१२-१३ ते २०१५-१६

---

ज्याअर्थी श्रमिक नागरी सहकारी पत संस्था,मर्या.वर्धा र.नं.३१५ हि संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधील तरतुदीनुसार नोंदणी झालेली असुन,सदर संस्थेला उक्त कायदा व व नियम तसेच संस्थेचे उपविधी यातील तरतुदी लागु आहेत.

उपरोक्त वाचा क्रं.१ अन्वये संस्थेच्या लेखापरीक्षक सौ.के.एस.खुरपडे उपलेखापरीक्षक,सहकारी संस्था,वर्धा यांनी आपला विशेष अहवाल सादर केलेला आहे.व सदर अहवालानुसार संस्थेमध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिसुन येत आहे.करिता झालेले संस्थेचे नुकसान निश्चित होणे आवश्यक आहे.

विशेष अहवालात व वाचा क्रं.२ अन्वये लेखापरीक्षण अहवाल नमूद खालील मुद्यावर चौकशी करणे आवश्यक आहे.

नियमन
३।८

**१) लेखापरीक्षण कालावधी दिनांक १.४.२०१२ ते ३१.३.२०१६ या कालावधीत संस्थेचे अध्यक्ष श्री.यशवंत नामदेवराव झाडे व संचालक मंडळ यांनी केलेल्या अनियमितते बाबत :-**

**अ) लेखापरीक्षणा करीता आवश्यक संपुर्ण रेकॉर्ड उपलव्ध करुन न दिल्या बाबत :-**

सन २०११-१२ चे लेखापरीक्षण अहवाल संस्थेस उपलब्ध नाही.तसेच संस्थेला वारंवार विचारणा करुन सुध्दा संस्थेनी सन २०११-१२ चे लेखापरीक्षण अहवाल तपासणी करीता उपलब्ध करुन दिलेला नाही.तसेच सन २०११-१२ ची आर्थिक पत्रके सुध्दा लेखापरीक्षणाकरीता सादर केलेली नाहीत. त्यामुळे सन २०१२ ते २०१६ चे लेखापरिक्षण करतांना प्राप्त झालेली आर्थिक पत्रके तपासणी करून प्रमाणित करता आलेली नाही. त्यामुळे सदर कालावधीत संस्थेत आर्थिक पत्रके सादर न केलेल्या उपरोक्त कालावधीत गैरव्यवहार असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कार्यालय जिल्हा उप-निबंधक
सहकारी संस्था, वर्धा
आवक क्रमांक २६८९
दिनांक ९।८।९६
विभाग

**ब) भागभांडवल परत केल्या बाबत:-**

संस्था तोटयात असतांना संस्थेचे नक्त मुल्य असल्यामुळे भागाचे मुल्य शुन्य झाले आहे. अशा परिस्थितीत संस्थेनी सन २०१२ ते २०१६ या कालावधीत सभासदांना भाग भांडवल परत केलेले आहे.

| अ. क्र. | सन | भाग भांडवल परत रक्कम |
|---|---|---|
| १. | २०१२-२०१३ | ५६१५०.०० |
| २. | २०१३-२०१४ | २४०१००.०० |
| ३. | २०१४-२०१५ | ११८४६०.०० |
| ४. | २०१५-२०१६ | १९६५०.०० |
| | **एकुण परत केलेले भाग भागभांडवल** | **४२६३६०.००** |

उपरोक्त रक्कम सभासदांना संस्था पोटनियमाचे उल्लंघन करून दिलेले असुन सदर रक्कम संस्थेचे अध्यक्ष व व्यवस्थापक मंडळ यांचे कडुन वसुल पात्र आहे.

**क) अखेर शिल्लक मर्यादेचे वर ठेवल्या बाबत:-**

संस्थेनी लेखापरीक्षण कालावधीत मोठया प्रमाणात अखेर शिल्लक संस्थेत ठेवलेली आहे.संस्था उपविधी क्र.ह १.५ तसेच सहकारी संस्था अधिनियम चे नियम १०७ (क) नुसार ५००/- चे वरील अखेर शिल्लक तीन दिवसाचे आंत (७२ तासाच्याआंत) जवळच्या सहकारी बॅकेत किंवा इतर मान्यता दिलेल्या खात्यात जमा करील. असे असतांना संस्थेचे व्यवस्थापक तथा अध्यक्ष श्री झाडे नी सन २०१२-२०१३ ते २०१५-२०१६ या कालावधीत मोठया प्रमाणात अखेर शिल्लक संस्थेत ठेवलेली असुन ती तिन दिवसाचे आंत संस्थेचे बँक खात्यात भरणा केलेली नाही. संस्था उपविधी अन्वये त्यास ते स्वत: जबाबदार असुन त्यांनी तिन दिवसा पेक्षा जादा ठेवलेल्या रक्कमेवर संस्थेच्या झालेल्या व्याजाचे नुकसानीची रक्कम त्यांचे कडुन संस्थेच्या प्रचलित दंड व्याजासह वसुल करण्यात यावी.

**उदा.**

| | | | |
|---|---|---|---|
| **१) ३१.३.२०१२** | **अखेर शिल्लक** | **रूपये** | **३०६७६४/-** |
| २) ३१.३२०१३ | अखेर शिल्लक | रूपये | ३१२५०३/- |
| ३) ३१.३२०१४ | अखेर शिल्लक | रूपये | ४४६२०२/- |
| ४) ३१.३.२०१५ | अखेर शिल्लक | रूपये | ५७३७०४/- |
| ५) ३१.३.२०१६ | अखेर शिल्लक | रूपये | ४३६१८४/- |

लेखापरीक्षणाचे वेळी संस्थेची रोकडपुस्तीका अपुर्ण असल्यामुळे अखेर शिल्लक तपासणी करता आलेली नाही. तसेच रोख तपासणी करीता मागणी करून सुध्दा उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संस्थेनी अखेर शिल्लक रक्कमेचा गैरवापर केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

संस्थेच्या संबंधीत विशेष अहवालात जरी सर्व जबाबदा-या श्री. यशवंत नामदेवराव झाडे यांच्यावर निश्चित करण्यांचे लेखापरिक्षकांनी जरी नमुद केलेले असले तरी सदर संस्थचे तत्कालीन संचालक मंडळ या सर्व बाबीसाठी तेवढेच जबाबदार असुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधील तरतुदीनुसार संस्थेचे नुकसान निश्चित करणे आवश्यक असुन त्यासाठी प्रत्येक मुद्यानुसार संचालक मंडळातील चौकशी करण्याबाबत कार्यवाही आवश्यक असल्याने खालील प्रमाणे आदेश आहेत.

**// आदेश//**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ आणि महाराट्र शासन, सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक सीएसएल १४९३/११६२/सीआर-४७/१५-सी दि.७ ऑगष्ट १९९३ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मी ज.मा. तलमले, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,तालुका वर्धा या आदेशान्वये चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यासाठी व संबधिताकडुन निश्चित केलेल्या रक्कमांच्या वसुलीसाठी श्री. **किसन हिरामन जाधव सहकार अधिकारी श्रेणी-१** यांची नियुक्ती करीत आहे.चौकशी अधिकारी यांनी संबंधित कायदा, नियम, संस्थेचे उपविधीतील तरतुदीनुसार चौकशी करावी.तसेच कायदेशिर तरतुदीनुसार चौकशी पार पाडुन आपला अहवाल सहा महिन्याच्या आत सादर करावा. त्याच प्रमाणे चौकशीसाठी लागणारा प्राथमिक खर्च संस्थेकडुन घेण्यांत येवुन, तदनंतर एकुणखर्च सर्व नुकसानीस जबाबदार असलेल्या,आलेल्या व्यक्तीवर सयुक्तीकरित्या आकारण्यात येऊन तसे निश्चित करण्यांत यावे.

सदर आदेश माझे सही व शिक्कयानिशी आज दिनांक ४/ ७/ २०१७ रोजी पारीत करण्यांत येत आहे.

(ज. मा. तलमले)
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था,तालुका वर्धा**

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, तालुका वर्धा

**प्रतिलिपी :-**

१)मा.जिल्हा-उपनिबंधक,सहकारी संस्था,वर्धा यांना माहितीस्तव सविनय सादर
२)मा.जिल्हा-विशेष लेखापरीक्षक श्रेणी-१ सहकारी संस्था,वर्धा यांना माहितीस्तव सविनय सादर
३)श्री.किसन हिरामन जाधव सहकार अधिकारी श्रेणी-१ अंतर्गत,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.वर्धा यांना पुढील कार्यवाहीस्तव.
४)अध्यक्ष/सचिव श्रमिक नागरी सहकारी पत संस्था,मर्या.वर्धा र.नं.३१५ ता.जि.वर्धा
५)श्री------------------------------------ संचालक/अध्यक्ष/सचिव, श्रमिक नागरी सहकारी पत संस्था,मर्या.वर्धा र.नं.३१५ ता.जि.वर्धा
६)व्यवस्थापक, श्रमिक नागरी सहकारी पत संस्था,मर्या.वर्धा र.नं.३१५ ता.जि.वर्धा

**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था,तालुका वर्धा**